मोटार वाहनांची वायुप्रदुषण तपासणी करुन वायुप्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (PUC) जारी करण्यासाठी राज्यातील वायुप्रदूषण नियंत्रण केंद्रांकडून आकारण्यात येणारे शुल्क बाबत.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
४ था मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान,
वांद्रे(पुर्व), मुंबई -५१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-
Email id - dycommr.enf2@gmail.com

क्र. पआका-०७२६/नस्ती क्र.२४/का-२ब/जा.क्र. 931 दि. 17 AUG 2026

संदर्भ : १. महाराष्ट्र स्टेट पीयुसी सेंटर ओनर्स असोसियशन,ठाणे यांचे दि.०२८.०३.२०२५ रोजीचे पत्र.
२. या कार्यालयाचे जा.क्र. १३०२७, दि. २७.१०.२०२५ रोजीचे पत्र.
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट पिटीशन १२९०६/२०२६ मधील दि.०४.०५.२०२६ रोजीचे आदेश.
४. शासनाचे पत्र क्र. एमव्हिआर-०५२५/प्र.क्र.२२२/परि-२, दि. १७.०७.२०२६.

परिपत्रक क्र. 46

महाराष्ट्र स्टेट पीयुसी सेंटर ओनर्स असोसियशन,ठाणे यांनी त्यांच्या उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये निवेदन देऊन वायुप्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (PUC) शुल्काच्या दरामध्ये वाढ करण्याची मागणी केली होती.

त्यास अनुसरुन या कार्यालयाने त्रिसदस्य समिती गठीत करुन इतर राज्याचे सध्याचे दर तपासून अहवाल सादर करण्यास आदेशीत केले. समितीने इतर राज्यातील वायुप्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राचा दरांचा अभ्यास करुन अहवाल सादर असून समितीच्या शिफारशीनुसार शासनास संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये दरवाढीबाबत अहवाल सादर केला.

उपरोक्त संदर्भ क्र. ३ च्या आदेशाअन्वये , All PUC Centers Owners Association विरुध्द State of Maharashtra & Anr. या रिट याचिका क्र. १२९०३/२०२३ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. ०४.०५.२०२६ रोजी आदेश पारित केले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आपल्या आदेशामध्ये परिवहन विभागाने याचिकाकर्त्यांचे निवेदन विचारात घेऊन कोणत्याही परिस्थितीत आदेश प्राप्त झाल्यापासून चार महिन्यांच्या आत निर्णय घेण्यात यावा, असे निर्देश दिले होते.

संदर्भ क्र. ४ च्या शासन पत्राद्वारे राज्यातील मोटार वाहनांची वायुप्रदुषण तपासणीच्या दरामध्ये सुधारणा करुन दर वाढीस मंजुरी देण्यात आली आहे.

सुधारीत दर वाढ पूढीलप्रमाणे-

अ.क्र.	वाहन प्रकार	दि.२७.०४.२०२२ च्या परिपत्रकानुसार सध्याचे दर (रु.)	प्रस्तावित वाढीव दर (रु.)
१.	दुचाकी वाहन	५०	६०
२.	पेट्रोलवरील तिनचाकी वाहन	१००	१२०
३.	पेट्रोल, सीएनजी, एलपीजी वर चालणारे वाहन	१२५	१५०
४.	डिझेलवर चालणारी वाहने	१५०	१८०

या परिपत्रकाद्वारे असे निर्देश देण्यात येत आहेत की, आपण आपल्या अधिपत्याखालील वायु प्रदुषण तपासणी केंद्रांच्या मालकांना वरीलप्रमाणे सुधारीत दरांची माहिती द्यावी. तसेच सदर सुधारीत दरांबाबत जनतेस विविध प्रसिध्दी माध्यमाद्वारे माहिती देण्यात याबी.

या संदर्भाने, प्रत्येक वायुप्रदूषण नियंत्रण केंद्रांवर सुधारीत दराचे फलक दर्शनीय भागात ठळकपणे प्रदर्शित करण्याबाबत सर्व वायुप्रदूषण नियंत्रण केंद्र मालकांना सूचित करावे.

सदर सुधारीत दरांनुसार वायुप्रदूषण नियंत्रण केंद्रांकडून अंमलबजावणी होत असल्याबाबत खातरजमा करावी. तसेच, विहित दरांपेक्षा अधिक शुल्क आकारले जाणार नाही, यांची दक्षता घ्यावी. याबाबत आपल्या कार्यालयातील वायुवेग पथकास आवश्यक सूचना जारी करण्यात याव्यात.

(राजेश नार्वेकर)
परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. मा. अपर मुख्य सचिव, गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
२. सह परिवहन आयुक्त (संगणक) यांना सदर वायुप्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (PUC) साठीचे सुधारीत शुल्कदर विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.
३. सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय यांना माहितीस्तव.
४. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना उचित कार्यवाहीस्तव.
५. महाराष्ट्र स्टेट पीयुसी सेंटर ओनर्स असोसियशन, गाळा नं. ७२, आनंद बाजार पेठ, अशर रेसिडेन्सी समोर, ग्लॅडिस अल्वारिस रोड, ठाणे.